**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**शुक्रवार दिनांक २३ जानेवारी २०२६**

**ठळक बातम्या**

1. **दावोस इथं झालेल्या वर्ल्ड इकॉनॉमिक फोरममध्ये आतापर्यंत एकूण ३७ लाख कोटी रुपयांचे सामंजस्य करार.**
2. **नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या १२९ व्या जयंतीनिमित्त त्यांना देशभरातून आदरांजली.**
3. **शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दीनिमित्त 'हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे - एसटी संगे तीर्थाटन' योजना सुरू.**
4. **भंडारा जिल्ह्यातील लाखनी इथं मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त 'बोलींचा जागर' या अभिनव उपक्रमाचं आयोजन.**

उद्योगमंत्री डॉ.उदय सामंत

दावोस येथे झालेल्या वर्ल्ड इकॉनॉमिक फोरममध्ये आतापर्यंत एकूण ३७ लाख कोटी रुपयांचे सामंजस्य करार करण्यात आले असून, त्यातून राज्यात ४० ते ४२ लाख युवक-युवतींना रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत. त्यामुळे दावोस दौरा शंभर टक्के यशस्वी ठरलेला आहे, अशी माहिती उद्योगमंत्री डॉ.उदय सामंत यांनी आज पत्रकार परिषदेत दिली. मागील वर्षी दावोस येथे झालेल्या वर्ल्ड इकॉनॉमिक फोरममध्ये १५ लाख कोटींच्या सामंजस्य कराराची मोठ्या प्रमाणात अंमलबजावणी सुरू आहे. गडचिरोली, छत्रपती संभाजीनगर, रत्नागिरी, रायगड आदी जिल्ह्यांत प्रत्यक्ष उद्योग उभे राहत असल्याचं डॉ.सामंत यांनी सांगितलं.

अश्विनी वैष्णव/फडणवीस

येत्या दीड वर्षात भारत आपला स्वत:चा मोबाईल ब्रँड सुरू करण्याच्या तयारीत असल्याचं केंद्रीय इलेक्ट्रॉनिक आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी सांगितलं. दावोस इथं सुरू असलेल्या जागतिक आर्थिक परिषदेतील एका सत्रात ते बोलत होते. भारतात एक मजबूत इलेक्ट्रॉनिक्स परिसंस्था असून, मोबाईल फोन क्षेत्रात भारताचा स्वत:चा ब्रँड आणण्याची वेळ आली असल्याचं त्यांनी म्हटलं आहे.

बाळासाहेब ठाकरे जन्मशताब्दी

शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त आज राज्यात विविध कार्यक्रम होत आहेत. उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे आणि त्यांच्या कुटुंबियांनी आज दक्षिण मुंबईतल्या ठाकरे यांच्या पूर्णाकृती पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहिली. यावेळी शिवसेनेचे आजी माजी नेते आणि कार्यकर्ते उपस्थित होते. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन आदरांजली वाहिली. हे वर्ष बाळासाहेब ठाकरे यांचं जन्मशताब्दी वर्ष असून त्यानिमित्त विविध लोकाभिमुख उपक्रम राबवण्यात येतील असं शिंदे यांनी यावेळी आयोजित वार्ताहर परिषदेत सांगितलं...

गड किल्ल्याची स्वच्छता, संवर्धन यासाठी स्वयंसेवी संस्थांना मानधन देण्यात येईल, शाळांचा दर्जा वाढवण्यासाठी स्पर्धा घेऊन विशेष पारितोषिक दिलं जाईल, महिला बचत गटाच्या सक्षमीकरणासाठी अनुदान अशा विविध योजनांची माहिती त्यांनी दिली. या संदर्भातल्या लोककल्याणकारी योजनांचा कृती आराखडा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस दावोसहून परतल्यावर एकत्रितपणे जाहीर करु असं ते म्हणाले.

नेताजी सुभाषचंद्र बोस जयंती

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती सी.पी.राधाकृष्णन आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या १२९व्या जयंतीनिमित्त त्यांना आदरांजली वाहिली आहे. नेताजींची जयंती पराक्रम दिवस म्हणून साजरी केली जाते. नेताजींचा वारसा प्रत्येक भारतीयासाठी प्रेरणादायक असल्याचं राष्ट्रपतींनी म्हटलं आहे. साहस, बलिदान आणि राष्ट्रीय एकता या आदर्श गुणांसाठी नेताजी स्मरणात राहतील, असं उपराष्ट्रपतींनी आपल्या संदेशात नमूद केलं आहे. दरम्यान केंद्र सरकारतर्फे देण्यात येणाऱ्या सुभाषचंद्र बोस आपदा प्रबंधन वैयक्तिक पुरस्कारासाठी यंदा लेफ्टनंट कर्नल सीता अशोक शेळके यांची निवड झाली आहे. केरळमधे वायनाड इथं २०२४ मधे भूस्खलनामुळे ओढवलेल्या आपत्तीत शेळके यांनी अभियांत्रिकी कौशल्याच्या सहाय्याने बचाव कार्यात लक्षणीय योगदान दिलं

होतं. मूळच्या अहिल्यानगरच्या सीता शेळके भारतीय सैन्याच्या मद्रास अभियांत्रिकी आस्थापनेत कार्यरत आहेत. ५ लाख रुपये आणि मानपत्र असं पुरस्काराचं स्वरुप आहे.

## एसटी संगे तीर्थाटन

हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या १०० व्या जयंतीनिमित्त महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळातर्फे 'हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे – एसटी संगे तीर्थाटन' योजना सुरू करण्यात येत आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या निर्देशानुसार साकारलेली ही योजना स्वस्त, सुरक्षित आणि परवडणाऱ्या दरात धार्मिक पर्यटनाचा अनुभव देणार आहे, अशी माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली. या योजनेत महिलांना आणि ज्येष्ठ नागरिकांना ५० टक्के सवलत तर ७५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांना मोफत प्रवासाची सुविधा मिळणार आहे. आजपासून राज्यातील २५१ आगारांतून ही योजना एकाचवेळी राबविण्यात येणार आहे.

## बदलापूर घटना-सपकाळ

बदलापूरमध्ये लहान मुलीवरील लैंगिक अत्याचाराची घटना अत्यंत संतापजनक आणि लज्जास्पद असल्याची टीका महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली. राज्यात गुन्हेगारांना मोकळे रान मिळाले असून सरकार आणि कायदा यंत्रणा हतबल झाल्याचा आरोप त्यांनी केला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पद सोडण्याची मागणी देखील त्यांनी केली आहे.

## वडेट्टीवार

चंद्रपूर महापालिकेतील सत्तास्थापनेबाबत आज गट स्थापन होऊन महापौर, गटनेता आणि स्थायी समितीचे निर्णय स्पष्ट होतील, असं काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी सांगितलं. बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त त्यांना अभिवादन करताना, त्यांचे हिंदुत्व राष्ट्रीय होते, सत्तेसाठी नव्हते, असे ते म्हणाले. वार्ताहरांच्या प्रश्नांना उत्तरे देताना बदलापूर बालिका अत्याचार प्रकरणावरून त्यांनी सरकारवर तीव्र टीका करत पोलिस आणि गृहविभागाचा धाक संपल्याचा आरोप केला.

‘बोलींचा जागर’

मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त मराठी भाषा विभाग, भाषा संचालनालय आणि भंडारा जिल्ह्यातील समर्थ महाविद्यालय, लाखनी यांच्या संयुक्त विद्यमाने ‘बोलींचा जागर’ हा विशेष कार्यक्रम उत्साहात पार पडला. कार्यक्रमाची सुरुवात ग्रंथदिंडी, प्रभातफेरी, भजन आणि पथनाट्याने करण्यात आली. उद्घाटन संताजी महाविद्यालय, पालंदुर येथील डॉ. संजयकुमार निंबेकर यांच्या हस्ते झाले. कोहळी आणि कोसरी या बोलीभाषांच्या जतन आणि संवर्धनावर तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी बोलीभाषेतील लोकगीते, पोवाडे आणि सांस्कृतिक सादरीकरणातून कार्यक्रमात रंगत आणली. बोलीभाषा जपल्यास मराठी भाषा अधिक समृद्ध होईल, असे मत मान्यवरांनी व्यक्त केले.

लेफ्टनंट जनरल डी.एस.कुशवाह

महाराष्ट्र, गुजरात आणि गोवा क्षेत्राचे जनरल ऑफिसर कमांडिंग लेफ्टनंट जनरल डी.एस. कुशवाह यांनी 20 ते 22 जानेवारी दरम्यान नागपूर, कामठी आणि पुलगाव येथील लष्करी आस्थापनांची पाहणी केली. या दरम्यान त्यांनी “लष्करी-नागरी एकात्मता” परिषदेचे अध्यक्षस्थान देखील भूषवले. या परिषदेत उपस्थित असेलेल्या शासकीय विभाग, राष्ट्रीय आपत्ती निवारण दल, उद्योग आणि शैक्षणिक क्षेत्रातील वरिष्ठ प्रतिनिधींशी त्यांनी संवाद साधला.

सचिव विजय वाघमारे

आदिवासी विकास विभागाचे सचिव विजय वाघमारे यांनी चंद्रपूर जिल्ह्यातील गोंडपिंडरी तालुक्यातील पाचगाव ग्रामसभेला भेट देऊन वनहक्क कायद्यांतर्गत मंजूर झालेल्या वैयक्तिक आणि सामूहिक वनहक्कांमुळे ग्रामस्थांच्या जीवनमानात झालेल्या बदलांचा आढावा घेतला. ग्रामस्थांशी संवाद साधत त्यांनी भविष्यातील अडचणी सोडविण्यासाठी शासनस्तरावर सहकार्य करण्याचे आश्वासन दिलं. त्यानंतर त्यांनी जीवती तालुक्यातील पाटण इथं शासकीय आश्रमशाळेस भेट देऊन शैक्षणिक आणि व्यवस्थापनाची पाहणी केली.

हवामान

हवामान-विदर्भात किमान तापमानासह कमाल तापमानात देखील वाढ होत आहे. आज गोंदिया जिल्हयात 13 अंश सेल्सिअस इतक्या किमान तापमानाची तर वाशिम जिल्हयात 31 पूर्णांक 4 अंश सेल्सिअस इतक्या सर्वाधिक कमाल तापमानाची नोंद करण्यात आली आहे. नागपुरात आज किमान तापमान 14 पूर्णांक 6 तर कमाल तापमान 29 पूर्णांक 6 अंश सेल्सिअस इतकं तापमान नोंदवण्यात आलं.

टी-ट्वेंटी क्रिकेट

भारत आणि न्यूझीलंड यांच्यातला टी-ट्वेंटी क्रिकेट मालिकेतला दूसरा सामना आज रायपूरमध्ये होणार आहे. पाच सामन्यांच्या या मालिकेतला पहिला सामना भारतानं जिंकला आहे. सामना संध्याकाळी ७ वाजता सुरू होईल.

*****